# REVIEW OF RESEARCH

UGC APPROVED

International Online Multidisciplinary Journal


ISSN 2249-894X

Impact Factor: 5.7631 (UIF)

UGC Journal Number: 48514

UGC List Number: 1232


# Maharashtra : History, Culture & Society



Editor
Dr. Devidas Waydande

Editor-in-Chief
Dr. Ashok Yakkaldevi

**Review of Research**

ISSN NO: 2249-894X
UGC Journal No.48514

Impact Factors: 5.7631(UIF)
UGC List No.1232

**Savitribai Phule Pune University, Pune**

M. S. Kakade College, Someshwarnagar
Tal- Baramati, Dist- Pune

# Department of History

## National Conference on

# *Maharashtra: History, Culture and Society*

**Date- 10th & 11th December 2018**

**Editor**
Dr. Devidas Waydande

**Principal**
Dr. Somprasad Kenjale

**Board of Editor**

Dr. Jaya Kadam
Dr. D. R. Dubal
Prof. Rupali Bhosale
Prof. Rani Shendkar
Prof. Kalyani Jagtap

| | | |
|---|---|---|
| 16 | महाराष्ट्राची वास्तुकला — गुहावास्तु विशेष संदर्भ : अजिंठा लेणी<br>पादर ज्ञानेश्वर बाळासाहेब | 70 |
| 17 | महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण आणि वारकरी भक्ती चळवळ<br>प्रा. डॉ. प्रवीण ताटे देशमुख | 73 |
| 18 | संयुक्त महाराष्ट्र चळवळ<br>श्री. प्रवीण बाजीराव साळुंके , डॉ. चांगदेव अरविंद बंडगर | 78 |
| 19 | एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक समस्या<br>प्रा मरे राजकुमार श्रीहरी | 84 |
| 20 | संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आणि कॉ. श्रीपाद अमृत डांगे<br>प्रा. नारायण राजूरवार | 87 |
| 21 | महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीत डॉ. नरेंद्र दाभोळकरांचे योगदान<br>प्रा. राणी शेंडकर | 92 |
| 22 | ज्ञानोदय वृत्तपत्रातून स्त्री शिक्षणावर पडलेला प्रकाश : एक चिकित्सक अभ्यास<br>प्रा. रूपाली भोसले | 95 |
| 23 | तंजावरचा शाहूराजा दुसरा यांच्या काळातील मराठी साहित्याचा विकास<br>सचिन अभिमन्यू ओहोळ | 100 |
| 24 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक विचार<br>प्रा. डॉ. सज्जन उध्दव पवार | 104 |
| 25 | महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा व कृषी संस्कृती<br>प्रा. डॉ. साळवे जगन्नाथ मोतीराम | 106 |
| 26 | पुणे जिल्ह्यातील आदिवासी महादेव कोळी जमातीची लोकसंस्कृती आणि विस्थापन<br>संपत मारूती ब्रम्हांडे | 110 |
| 27 | लक्ष्मीकांत देशमुख यांच्या 'पाणी!पाणी!' या कथासंग्रहातील पाण्याचे 'दुर्भिक्ष'<br>श्री. संदीप सदाशिव निर्मळ | 116 |
| 28 | संयुक्त महाराष्ट्र चळवळ: एक दृष्टिक्षेप<br>प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | 119 |
| 29 | दादू काका भिडे बालसुधारगृह, सांगली यांचे अनौपचारीक शिक्षणातील योगदान<br>डॉ. सीमा नवनाथ इंदलकर | 124 |
| 30 | पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत बाबूजी नाईक (जोशी) बारामतीकरांची कामगिरी<br>डॉ. शामराव घाडगे, प्रकाश बुवाजी पांढरमिसे | 128 |
| 31 | चित्रमय जगत मासिकाचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान<br>श्वेता ज्ञानेश्वर सावले | 132 |
| 32 | पूर्व मध्यकालीन मंगळवेढयाची राजकीय स्थिती<br>मन्सुर महंमद सुतार | 136 |
| 33 | शंकरराव किर्लोस्कर :महाराष्ट्रातील एक सामाजिक जाणीवा जपणारा संपादक<br>डॉ. स्वाती काळभोर | 142 |
| 34 | संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये कॉ. अहिल्या रांगणेकर यांचे योगदान<br>डॉ. उत्तम भगवान गोरड | 146 |

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5. 7631(UIF)

# महाराष्ट्राची वास्तुकला — गुहावास्तु
## विशेष संदर्भ : अजिंठा लेणी

**पादर ज्ञानेश्वर बाळासाहेब**
**सहा.प्राध्यापक , कला, वाणिज्य व विज्ञान महाविदयालय, सोनई , ता. नेवासा जि. अहमदनगर.**

**प्रस्तावना:—**



इतिहास लेखनासाठी आवश्यक असतात ती म्हणजे साधने. कारण प्रा.सेनबॉस याने असे म्हटले की साधन नाही इतिहास नाही. म्हणजेच साधनाशिवाय इतिहास नाही. साधनामध्ये प्रामुख्याने लिखित व अलिखित साधनाचा समावेश होतो. लिखित साधनात प्रामुख्याने प्राचीन अवशेष, ऐतिहासिक वास्तु, किल्ले, मंदिरे, लेणी यांचा समावेश होतो.

महाराष्ट्राचा इतिहास अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्राची वैभवता दाखविण्यासाठी याठिकाणी अनेक वास्तु उपयोगी पडतात. शिवाजी महाराजांचे वैभव पहायचे झाले तर त्यांची साक्ष देतात ते म्हणजे महाराजांचे गड किल्ले. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात प्राचीन मंदिरे. उदा. गोदावरी प्रवरा संगमावरील 'टोका' याठिकाणचे शिव मंदिर, घाट, औरंगबादचा बिबी का मकबरा अनेक वास्तु महाराष्ट्रातील वास्तुकलेची साक्ष आजही देतात. महाराष्ट्रत या वास्तुकलेबरोबरच प्रा कालखंडाचा विचार जर केला तर गुहावास्तु (लेणी) ही वास्तुकला जगाला भारताकडे पर्यटनासाठी ये भाग पाडणारी वास्तुकला आहे. ती म्हणजे वेरूळ अजिंठाची लेणी किंवा गुहा शिल्प ही होय.

**उद्देश :**

१. महाराष्ट्राच्या वास्तुकलेचा आढावा घेणे.
२. महाराष्ट्रातील वास्तुकलेतील प्राचीन वास्तुकलतील महत्वाचे म्हणजे गुहावास्तु (लेणी) चा अभ्यास करणे
३. वेरूळ, अजिंठा लेण्यांचा अभ्यास करणे.
४. बौध्द धर्माच्या चैत्य, विहार या शिल्पकलेचा अभ्यास करणे.
५. प्राचीन चित्रकलेचा अभ्यास करणे.
६. सातवाहन कालीन लेणी स्थापत्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

सदर शोधनिबंधासाठी दुय्यम साधनाचा वापर केला आहे. त्यामध्ये पुस्तके, शोध पुस्तिका, प्रत्य निरीक्षण इ. साधनाचा वापर केला आहे.

**गुहावास्तु :**

डोंगर रांगेतील दगड, पोखरून लोकांना वास्तव्य करण्यासाठी जागा उपलब्ध केली जात असे त्यास गुहा म्हणतात.भारतात जर प्रागैतिहासिक काळापासुन मानव वास्तव्यासाठी गुहेचा आश्रय घेत होता. नैसर्गिक गुहा व मानवनिर्मित गुहा असे दोन प्रकार प्रामुख्याने गुहाचे पडतात. महाराष्ट्रात देखील आपणास अनेक गुहा स्थापत्य पहावयास मिळते. बौध्द धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम अशोकाने हाती घेतल्यानंतर त्याने बौध्द भिक्षुच्या राहण्याच्या सोयी डोंगरात शैलगृह निर्माण केल्याचे आपणास दिसुन येते. महाराष्ट्रात गुहा स्थापत्याचा विचार केल्यास घारापुरी लेणी, कार्लेभाजे लेणी, जुन्नर नाशिक व औरंगाबादची अजिंठा वेरूळ लेणी विशेष उल्लेखलेल्या आहे.

**अजिंठा लेणी :**

जगाच्या इतिहासात भारताचे नाव स्थापत्य कलेच्या क्षेत्रात अजरामर करणारे स्थापत्य म्हणुन अजिंठा लेणीचा समावेश होता. या लेणीची निर्मिती ही इ.स.पु.दुस–या शतकात सुरू झाले व इ.स. ७ व्या शतकापर्यंत चालले. याचा विचार करता असे दिसते की या लेण्याची निर्मिती प्रदिर्घ काळ चालली असल्याने यात नाविन्यता नंतरच्या लेण्यात पहायला मिळते. या लेण्या सातवाहन,वाकाटकांच्या काळात निर्माण झाल्या आहे. वाकाटकांच्या काळातील लेणी क्र. १६ , १७ व १९ या बाबतीत पाश्चत्य कलाप्रेमी विचारवंत ''बर्जेस'' असे म्हणतो की, '' या लेण्या भारतातील सर्वच लेण्यापेक्षा जास्त सुंदर आहे. अजिंठाची ही लेणी जगाला भारताकडे आकर्षित करण्यात नक्कीच महत्वाची भुमिका बजावते.''

**अजिंठा लेणी व बौध्द धर्म :**

लेणी म्हटले की साहजिकच बौध्द व जैन धर्म आपणास दिसतो. ज्यावेळेस सम्राट अशोकाने बौध्द धर्माचा प्रचार व प्रसार काम हाती घेतले तेव्हा त्याने गौतम बुध्दाच्या रक्षा , अस्ती व अवशेष पुन्हा उत्खनन करून मिळविली त्यांच्या आधारे त्याने जवळ–जवळ ८४०० स्तुप बांधल्याचा उल्लेख मिळतो. त्याचबरोबर बौध्द व भिक्कुंना राहण्यासाठी निवासगृह त्यांची प्रार्थना गृह बांधण्यास प्रारंभ झाला आणि त्यातुनच खुप मोठया प्रमाणात संपुर्ण महाराष्ट्रात डोंगर कोरून अशा शैलगृह व चैत्यगृहाची निर्मिती झाली. अजिंठाच्या लेण्यात हिनयान आणि महायान या दोन्ही ही बौध्द पंथाचे वर्चस्व आपणास पहायला मिळते. याचठिकाणी गौतम बुध्दाची धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेत अवस्थेतील मुर्ती आहे. मात्र हिनयान आणि महायान या दोन्ही पंथीयाचे विहार, गुहा याठिकाणी आपणास पहायला मिळतात म्हणजेच बौध्द धर्मात जे दोन गट निर्माण झाले त्यांनी बौध्द धर्माचा व बौध्दाच्या तत्वज्ञानाचा प्रचाराचे जे काम केले ते समांतर असावे. कोणत्याही एखादया पंथाचे वर्चस्व वाढलेले नसावे.या दोन्ही ही पंथातील लेण्यांची निर्मिती वेगवेगळया कालखंडात झालेली आहे.

**अजिंठा लेण्यातील जीवंतपणा :**

प्राचीन महाराष्ट्राच्या शिल्पकलेचा विचार केल्यास ज्या ज्या मुर्ती कोरल्या गेल्या त्या त्या मुर्तीत जीवंतपणा घालविण्याचे काम साहजिकच कारागिरांनी केले आहे. अजिंठाच्या लेण्यात मुर्ती कोरताना मुर्तीच्या चेह–यावरील हावभाव, चेह–याची ठेवण, तत्कालीन शरीर रचना, वेशभुषा यासारख्या अगदिच बारीक गोष्टीच्या विचार केला गेला आहे. सिंदधार्म जेव्हा राज्याचा त्याग करून सन्यास घेवून अरण्याकडे निघतो त्यावेळच्या त्याच्या परिवाराचे चित्रण असेल किंवा धम्मचक्रप्रवर्तन मुद्रा असेल, गौतम बुध्दाची पद्मासनातील मुद्रा असेल यात आपणास आजही वास्तवता आणि जीवंतपणा जावणतो. तत्कालीन कारागीरांची श्रेष्ठता निश्चितच यातुन आपणास पहावयास मिळते.

**अजिंठ्याची चित्रकला :**

आजच्या सारख्या कोणत्याही कृत्रिम रंगाचा वापर न करता चित्राची रंगकता आजही नाविन्यपूर्ण वाटणारी चित्रकला आपणास मिळते. मारविजय चित्र, वज्रपाणी बोधीसत्व चित्र, चांपेक जातक या

चित्रामध्ये चित्रकाराने चित्ररेखाटताना त्याचित्रात वास्तवता आणि जीवंतपणा रेखाटलेले आपणास दिसते. अजिंठ्याच्या लेण्यातील या चित्रातुन बौध्दांचा संपूर्ण इतिहास समजतो. चित्रकाराने कदाचित रेखाटताना संपूर्ण बौध्द चरित्र प्रत्यक्ष डोळयाने पाहीले होते की नाही? परंतु बौध्दाचा इतिहास चित्रे यथार्थपणे दाखविला आहे.

**निष्कर्ष :**

महाराष्ट्रातील वास्तुकलेचा विचार केल्यास असे दिसुन येते की महाराष्ट्रात वेगवेगळ्या कालखंडात निर्मिती प्राचीन काळापासुन आजतागायत निर्मिती झाली. गुहावास्तु कला ही निश्चितच श्रेष्ठ वास्तुकला आहे. अजिंठा ही भारतातीलच (लेणी) आहे. यातुन आपणास सातवाहनाच्या स्थापत्य व वाकाटकांच्या स्थापत्य कलेचा त्यांच्या चित्रकलेचा व त्यांचे स्थापत्याबद्दल प्रेम यातुन समजते. त्या कालखंडातील कारागीर व चित्रकार निश्चीतच उच्च दर्जाचे कारागीर होते असे आपणास समजते. त्याचबरोबर यावरून असा निष्कर्ष निघतो की महाराष्ट्यत देखील बौध्द धर्माचा व त्यांच्या तत्त्वांचा प्रसार आणि प्रचार मोठया प्रमाणात झाला होता व महाराष्ट्रातील तत्कालीन राजवटींनी त्याला राजाश्रय देखील दिला होता.


**संदर्भ साधने :**

१. प्राचीन भारत – रोमीला थापर

२. महाराष्ट्र संस्कृती – डॉ. पु.ग. सहस्त्रबुदृधे (कॉन्टिनेन्टल प्रकाशन)

३. पेशवे कालीन महाराष्ट्र – वा.कृ. भावे (आय.सी.एच.आर)

४. प्राचीन भारताचा इतिहास – डॉ. अनिल कठारे (प्रशांत पब्लिकेशन्स)

५. भारतीय वास्तुकलेचा इतिहास – कृष्णदत्त वाजपेयी, प्रभाकर गद्रे (श्री. मंगेश प्रकाशन)

६. अजिंठा – राम अनंत थत्ते.